सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १९३ | रविवार, दि. ५ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com


## सोळा-सोळा लाखांच्या अजब जीम साहित्याच्या गजब कहाण्या...!

अमळनेर : येथील पालिकेला पुरविण्यात आलेल्या जीम साहित्यातील महाघोटाळ्याचा आँखों देखा हाल सोमवारपासून (६ एप्रिल २०२६) खास दै. 'ग्लोबल महातेज'च्या वाचकांना पाहावयास व वाचावयास मिळणार आहे. जीमच्या साहित्याचा प्रत्यक्ष दर्जा, किंमत व पालिकेतील अतिहुशार, अतिअभ्यासू व उच्चशिक्षित जबाबदार लोकांनी अदा केलेली अव्वाच्या सव्वा बिले पाहून सर्वांचे डोके चक्रावतील.

**जीमचे साहित्य ही तर फक्त झांकी आहे...!**
**बाकी अदा झालेल्या बिलातून खूप काही धक्कादायक निघणे बाकी आहे...!!**





## "संजय राऊत हे दुसरे अशोक खरात"



### आमदार अनिलदादा पाटील यांचे खळबळजनक वक्तव्य

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने आधीच राज्याच्या राजकारणात खळबळ उडविली असताना आता या प्रकरणाला आणखी राजकीय रंग चढताना दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाचे नेते व आमदार अनिलदादा पाटील यांनी शिवसेनेचे (उद्धव ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांची तुलना खरातशी केल्यामुळे सत्ताधारी आणि



विरोधकांमधील संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

अनिलदादा पाटील यांनी जळगावमध्ये पत्रकारांशी बोलताना संजय राऊत यांच्यावर सडकून टीका केली. "सजय राऊत हे दुसरे खरात झाले आहेत", असे म्हणत त्यांनी राऊत यांच्या अलीकडील विधानांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याने ज्या प्रकारे लोकांची खोटे भविष्य सांगून दिशाभूल केली त्याचप्रमाणे राऊत सध्या राजकीय भविष्यवाणी करीत असून, तीही तितकीच भ्रामक असल्याचा आरोप केला.

राज्यातील सत्तांतरानंतर शिवसेना (उद्धव ठाकरे गट) सातत्याने सत्ताधारी पक्षांवर टीका करत आहे. विशेषतः संजय राऊत यांनी त्यांच्या आक्रमक वक्तव्यांनी महायुतीला जेरीस आणले आहे. गेल्या काही दिवसांत तर त्यांनी अजितदादा पवार गट तसेच शिंदे गटातील काही आमदार लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचा दावा करून राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

## अमळनेरसह परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ; गांधलीतून डंपर तर ढेकूतून जनावरांची चोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : गेल्या काही दिवसांपासून शहरासह परिसरात चोऱ्या, खून, विनयभंग यासारख्या घटनांनी पुन्हा डोके वर काढणे सुरू केल्याचे दिसून येत आहे. त्याचाच भाग म्हणून तालुक्यातील गांधली येथील पेट्रोलपंपावर थांबलेले सुमारे १५ लाख रुपये किमतीचे डंपर चोरट्यांनी चोरून नेले आहे. तर दुसऱ्या घटनेत ढेकू येथून सुमारे ८७ हजार रुपये किमतीची पाच जनावरे चोरून नेली आहेत.



याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की निलेश संजय पाटील (रा. हिंगोणे) यांचे डंपर (एमएच ४८- एजी ८३०७) ३१ मार्च रोजी सायंकाळी गांधली येथील सप्तशृंगी पेट्रोलपंपावर लावलेले होते. रात्री साडेअकराच्या सुमारास सदर डंपर चोरीस गेल्याचे आढळून आले. निलेश यांनी ही घटना पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना सांगितली असता त्यांनी हवालदार मिलिंद सोनार, विनोद संदानशिव, निलेश मोरे, प्रशांत पाटील यांच्या पथकाला तपासासाठी पाठविले. त्यांनी सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक बाबी तपासल्या असता आरोपी सदर डंपर पातोंडामार्गे चोपडा येथून गुजरातकडे नेल्याचे आढळून आले. त्यामुळे संशयित आरोपीविरुद्ध डंपरमालकाच्या फिर्यादीवरून चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर पुढील तपास करीत आहेत. तसेच तालुक्यातील ढेकू खुर्द येथील महेंद्र सयाजीराव पाटील यांच्या ढेकू बुद्रुक शिवारातील गट नंबर ९७ मधील शेतातून १ एप्रिल रोजी रात्री चोरट्याने चार गायी व एक गोऱ्हा अशी एकूण ८७ हजार रुपये किमतीची ५ जनावरे चोरून नेली आहेत. याबाबत अमळनेर पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. हवालदार लक्ष्मीकांत शिंपी पुढील तपास करीत आहेत.




*अमळनेर : प्रताप महाविद्यालयातील मराठी विभागातील विद्यार्थिनी अंकिता जैन राष्ट्रीय पात्रता परीक्षा अर्थात नेट यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाली. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित मराठी विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर कांबळे आदी.*

## अंकिता जैन 'नेट' परीक्षा उत्तीर्ण

### प्रताप महाविद्यालयातील मराठी विभागात आनंदोत्सव

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील मराठी विभागासाठी अतिशय अभिमानाची बाब ठरावी अशी उल्लेखनीय कामगिरी विद्यार्थिनी अंकिता जैन हिने केली आहे. तिने राष्ट्रीय पात्रता परीक्षा अर्थात नेट यशस्वीरीत्या उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. जाधव यांनी अंकिता जैन हिचे कौतुक करत तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले, की अशा यशस्वी विद्यार्थ्यांमुळे महाविद्यालयाची शैक्षणिक परंपरा अधिक बळकट होते. या सत्कार सोहळ्यास मराठी विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी अंकिता जैन हिचे अभिनंदन करत तिच्या मेहनतीचे व चिकाटीचे कौतुक केले. इतर विद्यार्थ्यांनीही तिच्या यशातून प्रेरणा घेऊन शैक्षणिक प्रगती साधावी, असे सांगितले. यावेळी डॉ. रमेश माने, डॉ. विलास गावित, प्रा. योगेश पाटील, प्रा. तुषार पाटील, प्रा. सागर सैंदाणे आणि प्रा. गोपाळ बडगुजर उपस्थित होते. अंकिता जैन हिच्या या यशामुळे प्रताप महाविद्यालयाच्या मराठी विभागात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, तिच्या पुढील वाटचालीस सर्वांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.


आमचे वंदनीय स्वर्गीय
पिताश्री श्री. विठ्ठलराव महाले व मातोश्री श्रीमती कस्तुराबाई महाले
यांच्या स्मृती प्रित्यर्थ...
समस्त कलागुरू अर्थात गोकलाणी परिवार
अमळनेर शहराची शान वाढविणारे सर्वांत दिमाखदार...



'कस्तुरा-विठ्ठल पार्क'
निर्माण करीत आहेत. त्याबद्दल आमचा समस्त महाले परिवार
कायमस्वरूपी ऋणी राहील.
सदर पार्कला उदंड व्यावसायिक यश मिळो...!
या आमच्याकडून
अनेकोत्तम 'मंगलमय' शुभेच्छा...!

॥ शुभेच्छुक ॥

हेमंतकुमार महाले
(हेमंतकुमार म्युझिकल्स, मुंबई)

डॉ. डिगंबर महाले
अध्यक्ष : मंगळग्रह सेवा संस्था
नगरसेवक, अमळनेर

उल्हास (संजय) महाले
निवृत्त उपायुक्त (मुंबई महानगर पालिका)
निर्माता-दिग्दर्शक : हॅपी-लकी एंटरटेंनमेंटस्, मुंबई


### आजचे अभीष्टचिंतन





श्री. भीमराव महाजन
पत्रकार, अमळनेर



श्री. परेश चौधरी
अमळनेर



श्री. मुकेश भामरे
अमळनेर



श्री. विजय बोरसे
तज्ज्ञ संचालक : अर्बन बँक, अमळनेर



श्री. जिभाऊ कंखरे
अमळनेर



श्री. स्वानंद झाल्टे
अमळनेर



श्री. सुमीत भावसार
रवी बॅग हाऊस, अमळनेर

### दिनविशेष

०५ एप्रिल

- महात्मा गांधींनी २४१ मैलांचा प्रवास करून दांडी यात्रा पूर्ण केली.
- भारत स्काउट गाईडची स्थापना झाली.
- राष्ट्रीय समुद्री दिवस
- जळगाव नगरपालिकेच्या १७ माजली इमारतीचे उद्घाटन.
- अभिनेत्री सुलोचना यांच्या हस्ते डी. डी. १० या मराठी उपग्रह वाहिनीचे सह्याद्री असे नामकरण करण्यात आले.

## संपादकीय

# कालसुसंगत दिलासा

काही ठिकाणी रेडीरेकनरच्या दरांपेक्षा प्रत्यक्षातील बाजारभाव कमी असल्याचा विरोधाभास दिसून येतो. या दरांत वाढ झाल्याने ही विसंगती आणखी ठळक झाली असती. अर्थव्यवस्था सावरत असतानाच युद्धाचे संकट उद्भवले असून बांधकामासह विविध क्षेत्रांना त्याचे फटके बसू लागले आहेत. घरे किंवा मोकळी जागा खरेदी करण्यासाठी लागू करण्यात येणाऱ्या वार्षिक बाजारमूल्याचे (रेडीरेकनर) दर स्थिर ठेवण्याचा राज्य सरकारचा निर्णय कालसुसंगत आणि व्यावहारिक आहे. नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाकडून यंदाच्या रेड रेकनरच्या दरात पाच ते आठ टक्के वाढीचा प्रस्ताव सुचवण्यात आला होता; मात्र बाजारातील परिस्थिती पाहता रेडी रेकनरच्या दरांमध्ये वाढ करू नये, अशी बांधकाम व्यावसायिकांची मागणी होती. युद्धजन्य परिस्थितीमुळे अर्थव्यवस्थेवर होऊ घातलेल्या परिणामांचा विचार करून राज्य सरकारने या दरांमध्ये वाढ न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एकीकडे गृहबांधणी उद्योग आणि दुसरीकडे ग्राहकांनाही दिलासा मिळाला आहे. विशेषतः गेल्या दोन वर्षांत निवडणूक काळात अशा सवलती अपेक्षित होत्या; मात्र आता सगळ्या निवडणुका पार पडल्यानंतर महसुलावर पाणी सोडण्यास सहसा तयार नसणाऱ्या सरकारने हा निर्णय घेतला, याचा अर्थ ती बाजाराची निकड आहे, असे म्हणावे लागेल. कोरोनाच्या साथीमुळे भारताप्रमाणेच साऱ्या जगाच्या अर्थव्यवस्थेला फटका बसला होता. रोजगार बुडाल्यामुळे आवश्यक तेवढाच खर्च करण्याशिवाय अनेकांपुढे पर्याय नव्हता. साहजिकच घरखरेदीसारख्या खर्चांबाबत ग्राहकांनी हात आखडता घेतला; तर अनेकांना नव्या घरखरेदीचा विचारही सोडून द्यावा लागला होता.

गृहबांधणी हा प्रचंड प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देणारा उद्योग असल्याने त्या क्षेत्राची चाके फिरती राहण्यासाठी सरकारनेही विविध उपाययोजना केल्या. गेल्या काही वर्षांत रेडीरेकनरच्या दरांत माफक वाढ करण्यात आली. राज्यातील प्रमुख शहरांमध्ये आधीच घरांचे दर गगनाला भिडले आहेत. सरकारच्या धोरणांमुळे चटईक्षेत्र मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले असले, तरी जमिनींना सोन्याचे दर आले आहेत. त्यातच बांधकाम साहित्याच्या दरांतही सातत्याने वाढ होत आहे. याबरोबरच केंद्र–राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे विविध कर–उपकर यांचाही त्यात मोठा वाटा आहे. या सर्वांचा बोजा अंतिमतः ग्राहकांवरच पडतो आणि घरांच्या किमती वाढत राहतात. युद्धस्थितीमुळे इंधन दरवाढीची भीती असून, त्यामुळे एकंदर महागाई वाढण्याची भीती आहे. बांधकाम साहित्य आणि कच्च्या मालाच्या दरांमध्ये मोठी वाढ झाल्याने घरांचा निर्मितीखर्च वाढला आहे. दुसरीकडे युद्धजन्य स्थितीत अनेक उद्योग बंद पडत असून, त्यांच्यावर अवलंबून लघुउद्योग आणि तेथील हजारो कामगारांना रोजगार गमावण्याची चिंता सतावत आहे. अशा काळात राज्य सरकारचे या क्षेत्रावर करांचा अधिक बोजा न टाकण्याचे धोरण हे अनिश्चिततेच्या काळात उचललेले सावध पाऊल म्हणता येईल. अर्थात रेडीरेकनरचे दर वाढले नसले, तरी राज्यातील अनेक शहरांचे विकास आराखडे आणि प्रादेशिक आराखडे मंजूर झालेले आहेत. तेथील जागांची सद्यःस्थिती कागदोपत्री बदलल्याने त्यापोटी अधिक मुद्रांक शुल्काची भर सरकारी तिजोरीत पडू शकते.

गेल्या वर्षी रेडीरेकनरमध्ये माफक वाढ झाली, तरी एकूण मालमत्ता खरेदीच्या व्यवहारांचे प्रमाण ४६ लाखांपर्यंत वाढले आहे. त्यामुळे दरवाढ न करताही अधिक महसूल मिळू शकतो, असाही विचार सरकारने केलेला दिसतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेमध्ये करोनाकाळासारख्या आव्हानांची तयारी ठेवण्याचे सूतोवाच केले होते; केंद्र सरकारनेही विविध उद्योगांना मदतीचा हात देऊ केला आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या या निर्णयाकडे बघावे लागेल. महाराष्ट्र हे साऱ्या देशात शहरीकरणात आघाडीवर असलेले राज्य असल्याने मुंबई–पुण्यासह सर्वच शहरे आणि त्यालगत प्रचंड प्रमाणात घरबांधणी सुरू आहे. या क्षेत्रात प्रचंड आर्थिक उलाढाल होत आहे आणि लाखोंच्या संख्येने प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होत आहे. अशा उद्योगातील चलनवलन सुरू ठेवणे, ही साऱ्या अर्थव्यवस्थेची अपरिहार्यता आहे. त्याबरोबरच स्वतःचे घर असावे, असे प्रत्येक नागरिकाचे स्वप्न असते. मात्र, गृहकर्जांचे हप्ते, फर्निचरपासूनचे खर्च आणि सरकारी कर अशा वेगवेगळ्या खर्चांमुळे प्रमुख शहरांमध्ये घरखरेदी आवाक्याबाहेर जाते. हे स्वप्न साकार करण्यासाठी रेडीरेकनरमध्ये दिलासा देण्याबरोबरच परवडणाऱ्या घरांच्या धोरणाला गती देणे, वेगवेगळ्या शहरांमध्ये व लगतच्या परिसरात नगररचना योजना हाती घेणे, सार्वजनिक वाहतुकीची गतिमान साधने पुरवून काही अंतरावर निवासी भागास चालना देणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या वाढत्या वस्तीला पुरेशा पायाभूत सुविधा राबवणे, ही काळाची गरज आहे, हेही लक्षात घ्यायला हवे.

# युद्धाचा बहाणा की कृत्रिम महागाई?

## अमळनेरमधील बाजारपेठेतील दरवाढीवर प्रश्नचिन्ह

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : कोसो मैल दूरवर असलेल्या इराण–अमेरिका यांच्यातील युद्धाचा काही अंशी का होईना येथील स्थानिक बाजारपेठेवर परिणाम झालेला जाणवत आहे. त्यातून येथील अनेक व्यापाऱ्यांनी या परिस्थितीचा आधार घेत कृत्रिम दरवाढ केल्याची चर्चा शहरवासीयांमध्ये रंगू लागली आहे. कोणत्याही वस्तूच्या वाढीव दराबाबत विचारणा केली असता, 'भाऊ, युद्ध सुरू आहे ना' असे एकच वाक्य या मंडळींकडून ठासून सांगत या दरवाढीचे समर्थन केले जात असल्याचे चित्र शहरात सध्या दिसून येत आहे.

सध्या केळी, सफरचंद, आंबे, खाद्यतेले, डाळी तसेच इलेक्ट्रॉनिक वस्तूंसह अनेक दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे दर कमालीचे वाढले आहेत. काही वस्तूंचे दर इतके वाढले आहेत, की त्या सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत. त्यामुळे महागाईचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. युद्धजन्य परिस्थितीत कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने खाद्यतेलाच्या दरात वाढ होणे काही प्रमाणात अपेक्षित मानले जात आहे. नागरिकांनीही ही बाब काहीअंशी स्वीकारलीही आहे. मात्र, इतर अनेक वस्तूंमध्ये झालेली दरवाढ संशयास्पद वाटत असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे पेट्रोल व डिझेलच्या दरात सध्या वाढ झालेली नसली, तरी त्यामागे काही राज्यांतील निवडणुकांचे कारणही असल्याची चर्चा तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे इंधनदर स्थिर असताना इतर वस्तूंच्या किमतीत होणारी वाढ अधिकच खटकणारी आहे.

दरम्यान, बाजारात लहान व्यापारी असो किंवा मोठा, दरवाढीचे कारण विचारल्यास माल येत नाही, युद्धामुळे अडचणी आहेत, अशीच ठरलेली उत्तरे दिली जात आहेत. काही प्रमाणात युद्धाचा परिणाम असला, तरी अनेक वस्तूंमध्ये कृत्रिम दरवाढ होत असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. एकूणच युद्धाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे ग्राहकांमध्ये नाराजीचे वातावरण असून, संबंधित यंत्रणांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

**दलालामार्फत विवाहनिश्चिती प्रकरण**

# अकोला येथील मुलीकडून मिळाला पहिल्याला झटका, दुसऱ्याला फटका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अमळनेर : दलालामार्फत अडीच लाख रुपयांत व्यवहार घडवून आणलेल्या पत्नीने आठ दिवसांत पळ काढला आणि अवघ्या चार महिन्यांत दुसऱ्या ठिकाणी दीड लाख रुपयांचा व्यवहार करून लग्न लावल्याचा प्रकार आढळून आला आहे. याबाबत संबंधित तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकाराची माहिती अशी, की मुकेश रमेश शिरसाठ (वय ३१, रा. सानेनगर–अमळनेर, ह. मु. आडाजंग पाटीया–सुरत) याने विवाहासाठी चुंचाळे (ता. चोपडा) येथील बहिणीचे सासरे भिकन महादू पाटील यांच्या मध्यस्थीने दुर्गा गजानन थाटोड (रा. गायेगाव, ता. अकोला) हिच्याशी विवाह निश्चित केला. त्यांनी या बदल्यात अडीच लाख रुपये दुर्गा व तिची मावशी नंदा आणि त्यांच्यासोबतच्या एका मध्यस्थाला दिले. ठरल्याप्रमाणे १० डिसेंबर २०२५ रोजी त्यांनी कुलदेवता बिजासनी माता मंदिरात (मध्य प्रदेश) साध्या पद्धतीने विवाह लावला आणि अमळनेर येथे सत्यनारायण महापूजा केली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मुकेश दुर्गाला घेऊन सुरत येथे रवाना झाला. मात्र, २२ डिसेंबर २०२६ रोजी पत्नी दुर्गा सकाळी सातच्या सुमारास न सांगता माहेरी पळून गेली होती. त्यामुळे मुकेशने विवाह निश्चितीसाठी दिलेले अडीच लाख रुपये परत मागितले असता दुर्गाने मला पैसेच मिळालेले नाहीत, असे सांगितले. त्यामुळे मुकेश संतापात निघून गेला. ३० मार्च २०२६ रोजी मुकेशला त्याची मैत्रीण सविता दीपक पाटील हिने फोन करून कळविले की तुझी पत्नी दुर्गा वाघळूद (ता. धरणगाव) येथील राकेश पाथरवट याच्याशी लग्न करत आहे. तिने दुर्गाचे फोटो देखील व्हॉट्सॲपद्वारे पाठविल्याने त्याची खात्री पटली. त्यांतर तो पोलिसांच्या मदतीने पत्नी दुर्गाला शोधायला वाघळूद येथे ३१ मार्च २०१६ रोजी गेला असता दुर्गा तेथे आढळून आली नाही. २ एप्रिल २०२६ रोजी पत्नी दुर्गा आणि तिचा सध्याचा पती राकेश सुभाष पाथरवट हे दोघे अमळनेर पोलीस ठाण्यात आल्याचे समजले. त्यामुळे मुकेश अमळनेर पोलीस ठाण्यात आल्यावर कळाले, की राकेश पाथरवट याने देखील तिला दीड लाख रुपये विवाह निश्चितीसाठी दिले होते. त्यामुळे मुकेशच्या फिर्यादीवरून पत्नी दुर्गा, तिची मावशी नंदा आणि अज्ञात एक जण अशा तिघांविरुद्ध फसवणुकीचा गन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लहान आणि सुंदर पक्षी 'फुलचुगी'

**पक्ष्यांची ओळख**

**नाव :** फुलचुगी Flower-pecker
**रंग :** नराची पाठ चमकदार, निळसर, हिरवट असते व पोट फिकट नारिंगी, पिवळे, तर मादी पूर्ण तपकिरी रंगाची
**चोच :** लहान, बाकदार, काळी
**डोळे :** या लहानशा पक्ष्याचे डोळे काळपट लालसर पण तीक्ष्ण असतात.
**घरटे :** या पक्ष्याचे घरटे उंच घनदाट झाडीत फांदीला पिशवीसारखे लटकलेले असते. गवत, वनस्पती तंतू यापासून हा पक्षी घरटे बनवितो. आत जाण्यासाठी एक गोल दार असते. घर उंच असल्यामुळे सापांपासून सुरक्षितता मिळते.
**अंडी :** मादी उन्हाळ्यात दोन–तीन अंडी घालते. अंडी पांढरी लहान असून, त्यावर लालसर ठिपके असतात.
**भक्ष :** फ्लॉवरपेकर पक्षी फुलांमधील रस आणि फळे खातात. झाडांवरील कीटकसुद्धा खातात.
**आवाज :** या लहान पक्ष्याचा आवाज बारीक पण तीक्ष्ण असतो. नर मादीला आकर्षित करण्यासाठी गाणी गातो.



**इतर वैशिष्ट्ये :** हे लहान पक्षी परागीभवनात महत्त्वाची भूमिका निभावतात. डॉ सलीम अली यांनी या चपळ पक्ष्याच्या ५० प्रजाती नोंदविलेल्या आहेत. हा पक्षी भारतभर आढळतो. अमळनेरात शिवाजी बागेत, त्रिकोणी बागेत, श्री मंगळग्रह मंदिराच्या झाडीत, अंबर्षी ऋषींच्या टेकडीच्या झाडीत हा पक्षी दिसतो.

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी, निसर्ग मित्रमंडळ, अमळनेर.**

# एप्रिल फूल म्हणजे नेमके काय?


## याच दिवशी का साजरा केला जातो हा मूर्ख शिरोमणीचा दिवस?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्याला कुणीतरी मूर्ख बनवते आणि तरीही आपण चिडत नाही, हसण्यावारी नेतो असा वर्षभरातील एकमेव दिवस म्हणजे एप्रिल फूल. पण एक एप्रिल याच दिवशी का साजरा केला जातो हा मूर्ख शिरोमणीचा दिवस? काय कारणे आहेत त्यामागे? देशोदेशीच्या काय परंपरा आहेत?

एक एप्रिल म्हटले, की आपोआप हे गाणे आपल्या ओठांवर रेंगाळू लागते, 'एप्रिल फूल बनाया, तो उनको गुस्सा आया' आणि मग मनात दाटून येतात त्या असंख्य आठवणी. आठवणी ज्यांत आपण कोणाला तरी मूर्ख बनविलेले असते किंवा आपण तरी मूर्ख ठरलेलो असतो. हा मजेशीर जागतिक 'मूर्ख दिन' कसा चालू झाला हे आजही एक कोडेच आहे. अर्थात लोकांना मूर्ख बनविण्याची ही परंपरा कधीपासून सुरू झाली, याबाबत मतभिन्नता असली तरी काही लोक याची सुरूवात फ्रान्स तर काही जण इंग्लंडमध्ये झाल्याचे सांगतात. 'एप्रिल फूल डे'ला ऑल 'फूल डे' असेही म्हणतात.

बहुतेक जणांच्या मते या दिवसाचा उगम १५८२ मध्ये फ्रान्समध्ये झाला. पोप ग्रेगरी १३ वे यांनी जुन्या प्रचलित ज्युलियन कॅलेंडरच्या जागी नवीन ग्रेगरियन कॅलेंडर वापरात आणायचे ठरविले. त्यामुळे नवीन वर्षारंभ १ एप्रिल ऐवजी १ जानेवारी ठरला. त्या काळी काही कर्मठ लोकांनी हा बदल स्वीकारायचे नाकारले, तर दळणवळण, संदेशवहनाच्या साधनाच्या अभावी काही जणांपर्यंत हा बदलच उशिरा पोहोचला. जे लोक एक एप्रिललाच नवीन वर्ष साजरे करायचे त्यांना इतर जण मूर्ख ठरवू लागले व अशा रीतीने 'एप्रिल फूल'चा जन्म झाला. तेव्हापासून एप्रिल महिन्यातील पहिल्या तारखेला 'एप्रिल फूल'




बनविण्याच्या प्रथेला प्रारंभ झाला. कालांतराने ही प्रथा संपूर्ण युरोपात पसरली. पश्चिमी देशांत 'एप्रिल फूल' बनविण्याला समाजमान्यता मिळाली.

प्रत्येक देशागणिक एप्रिल फूल डे साजरा करण्याची पद्धत बदलते. उदा.– स्कॉटलंड मध्ये हा दिवस दोन प्रकारे साजरा केला जातो. पहिल्या दिवशी 'हंट द गॉक' म्हणून तर दुसऱ्या दिवशी 'टेली डे' म्हणून. टेली डेला माणसाच्या पाश्वभागावर आधारित थट्टामस्करी, चेष्टा केली जाते. उदा.– 'किक मी'सारखा नाठाळ स्टिकर पार्श्वभागावर चिकटविणे किंवा एखादी लांबलचक शेपटीच चिकटविणे. पोर्तुगालमध्ये या दिवशी मित्र एकमेकांवर पीठ उडवतात. इंग्लंडमध्ये या दिवशी ज्या मूर्खांना फसविले जाते त्यांना गॉब्स किंवा गॉबी म्हणतात. ज्यांच्यावर विनोद केले जातात त्यांना 'नूडल' म्हणतात. फ्रान्समध्ये ज्यांना मूर्ख बनविले जाते त्यांच्यापाठी पेपरचे फिश (मासा) चिकटविले जातात व मग मोठ्याने 'एप्रिल फिश' म्हणून चिडविले जाते. या दिवशी हास्यविनोदाचे काही नियम नसतात, कायदा नसतो. ब्रिटन, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेमध्ये एप्रिल फूलची मजा दुपारपर्यंत चालते, तर फ्रान्स, आयर्लंड, इटली, दक्षिण कोरिया, जपान, रूस, नेदरलँड, जर्मनी, ब्राझील, कॅनडा व अमेरिका येथे दिवसभर जोक्स आणि मजेचा सिलसिला चालू असतो. अफवा पसरविण्यात, थट्टा–मस्करी करण्यात माध्यमांमधील लोकही हिरिरीने भाग घेतात. हाच ट्रेंड पुढे अमेरिका, ब्रिटनमध्येही रूळला. भारतात ही परंपरा इंग्रजांनी आपल्यासोबत आणली. पारतंत्र्याच्या काळात इंग्रज अधिकारी त्यांच्या–त्यांच्यात अशा प्रकारचा खेळ खेळायचे. पुढे इंग्रज त्यांच्या या खेळात भारतीयांनाही सामावून घेऊ लागले. भारतीयांनाही दुसऱ्यांना मूर्ख बनविण्याचा धंदा फार आवडला. भारतीय मनोरंजनवादी. त्यांनी हा खेळ पटकन उचलला.

बघता–बघता मूर्ख बनविण्याचा दिवस संपूर्ण भारतात साजरा केला जाऊ लागला. इंग्रज आपल्यातून निघून गेले, पण त्यांची ही विचित्र परंपरा भारतात कायम राहिली. पण ही प्रथा भारतीयांनी जशीच्या तशी आपल्या गळी उतरवली नाही. त्याला भारतीय स्वरूप देण्यात आले. प्रसारमाध्यमेही याबाबत अजिबात मागे नाहीत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे १९५७ मध्ये 'बीबीसी'ने प्रसारित केलेली बातमी. ज्यात स्विस लोक स्पॅगेटीचे पीक घेत आहेत व झाडाला नूडल्स लागल्या आहेत, असे दाखविण्यात आले होते. १९८२ मध्ये ब्रिटीश दूरचित्रवाणीने 'एप्रिल फूल'च्या निमित्ताने एक सनसनाटी बातमी देऊन खळबळ उडवून दिली होती. सेंटपाल संग्रहालय त्याच्या मूळ ठिकाणावरून हटवून रिजेंट पार्कमध्ये ठेवण्यात आले आहे, अशी ती बातमी होती. अशाच प्रकारची ८० च्या दशकात एका वृत्तसंस्थेने 'इराण–इराक दरम्यानचे युद्ध विनाअट संपले' अशी बातमी देऊन आश्चर्यात टाकले होते. त्यामुळे मोठी खळबळ उडाली होती. कित्येकदा 'एप्रिल फूल' बनविण्याच्या अशा प्रकारच्या सनसनाटी बातम्यांमुळे वाईट परिणामांनाही सामोरे जावे लागले आहे. आपल्या

# तब्बल ७८१ वर्षे सुरू होते युद्ध

## जगात सर्वाधिक काळ चाललेला संघर्ष; कोण जिंकले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मध्य पूर्वेत इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्या युद्धाचा भडका उडाला आहे. एक महिना झाले हे युद्ध सुरू आहे. इतिहासात असे अनेक संघर्ष झालेत जे काही महिने नव्हे तर तब्बल काही शतकांपर्यंत सुरू होते.

**७८१ वर्षे युद्ध :** आतापर्यंत सर्वाधिक काळ चाललेले युद्ध हे इसवी सन ७११ ते इसवी सन १४९२ पर्यंत झाले. इबेरियन पेनिनसुलामध्ये हे युद्ध तब्बल ७८१ वर्षे सुरू होते.

**८ व्या शतकात सुरूवात :** ख्रिश्चन राज्यांनी मूर्स नावाच्या मुस्लिम राजवटीतील भागावर ताब्याचा प्रयत्न केला होता. ८ व्या शतकात मुस्लिम सैन्याने स्पेन आणि पोर्तुगीजांच्या भागावर ताबा मिळविल्यानंतर युद्ध सुरू झाले.

**१४९२ ला शेवट :** कित्येक शतके सुरू राहिलेल्या या युद्धात कॅस्टिले, एरागॉन, लियोन यासारख्या ख्रिश्चन राज्यांनी नियंत्रण मिळवलं. शेवटी ही लढाई ग्रेनेडाच्या पराभवानंतर१४९२ मध्ये थांबली.

**रोमन – फ्रेंच :** रोमन फ्रेंच युद्ध इसवी सन पूर्व ५४ ते इसवी सन ६२८ पर्यंत असे ६८१ वर्षे सुरू होते. यात रोमन साम्राज्यापासून बाइजेंटाइन साम्राज्याने पार्थियन आणि ससानियन राजवटींसोबत फ्रेंचांविरोधात युद्ध लढलं.

**२१४ वर्षे युद्ध :** बाइजेंटाइन आणि ओटोमन युद्ध १२६५ ते १४७९ या कालावधीत २१४ वर्षे सुरू होते. यात ओटोमन तुर्कांनी अनातोलिया आणि बाल्कनपर्यंत आपला विस्तार केला. कॉन्स्टिटिनोपलच्या पराभवाने हे युद्ध थांबले.

**इंग्लंड – फ्रान्स :** फ्रान्सच्या राजगादीवरून इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यातही ११६ वर्षे युद्ध झाले होते. १३३७ ते १४५३ या कालावधीत हे युद्ध झाले.

# सिलिंडर भरायला गेला आणि पोलिसांच्या जाळ्यात अडकला





## पत्नीच्या हत्येतील आरोपी कसा सापडला?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गेल्या चार वर्षांपासून पत्नीच्या हत्या प्रकरणात फरार असलेल्या आरोपीला पंजाब पोलिसांनी अटक केली आहे. संदाप तोमर असे या आरोपीचे नाव असून, तो भारतीय सैन्य दलातील माजी कॅप्टन आहे.

संदीप तोमरच्या अटकेची कारवाई काहीशी नाट्यमयरित्या घडून आली आहे. झाले असे, की आरोपी संदीप तोमरने एलपीजी सिलिंडर भरताना पैशांचा व्यवहार करण्यासाठी बँक खाते आणि पॅन कार्ड यांचा उपयोग केला आणि तो पंजाबच्या फाजिल्का पोलिसांच्या जाळ्यात अडकला. फाजिल्काचे पोलीस अधीक्षक गुरमीत सिंग यांनी एका वृत्तवाहिनीला ही माहिती दिली.

सैन्य दलात माजी कॅप्टन असलेल्या संदीप तोमरविरोधात पत्नीला मारहाण करणे, हुंड्याची मागणी करणे आणि तिच्या मृत्यूस जबाबदार असल्याचे आरोप ठेवून २०१३ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही तक्रार संदाप तोमरच्या पत्नीच्या वडिलांनी केली होती, अशी माहिती पोलीस अधीक्षक गुरमीत सिंग यांनी दिली.

संदीप तोमरने पत्नी श्वेता सिंगची हत्या केली होती आणि ती आत्महत्या असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला होता, असे गुरमीत सिंग यांनी सांगितले. परंतु संदीप तोमरनेच पत्नीची हत्या केली होती, हे पोलीस तपासात सिद्ध झाले. घटनेच्या दिवशीच त्याला अटक करण्यात आली होती. पत्नीच्या हत्येप्रकरणी संदीप तोमरने ५ वर्षे तुरुंगवास भोगला होता. मात्र, २०१९ मध्ये पंजाब–हरियाणा उच्च न्यायालयाने त्याची जामिनावर सुटका केली होती.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# स्त्रीशिक्षणाच्या क्रांतिकारक पुरस्कर्त्या : पंडिता रमाबाई

**स्मृतिदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासात पंडिता रमाबाई यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. महिलांच्या हक्कांसाठी, शिक्षणासाठी आणि सन्मानासाठी आयुष्य वेचणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाचा स्मृतिदिन आपल्याला त्यांच्या कार्याची नव्याने आठवण करून देतो.

### प्रारंभिक जीवन आणि शिक्षण

पंडिता रमाबाई यांचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी झाला. त्यांचे वडील अनंतशास्त्री डोंगरे हे संस्कृत पंडित होते. त्यांनी आपल्या मुलीला संस्कृतचे शिक्षण दिले, जे त्या काळात अत्यंत दुर्मीळ होते. रमाबाई यांनी लहान वयातच वेद, उपनिषद यांचे ज्ञान मिळविले आणि त्यांना 'पंडिता' ही उपाधी मिळाली.

### महिलांच्या स्थितीबद्दलची जाणीव

त्या काळात भारतीय समाजात महिलांची स्थिती अत्यंत दयनीय होती. बालविवाह, विधवांवरील अन्याय, शिक्षणाचा अभाव यामुळे महिला सामाजिक बंधनांमध्ये अडकलेल्या होत्या. रमाबाई यांनी या परिस्थितीचा जवळून अनुभव घेतला आणि स्त्रियांच्या उन्नतीसाठी कार्य करण्याचा निर्धार केला.

### समाजसुधारणेची वाटचाल

पंडिता रमाबाई यांनी महिलांसाठी शिक्षणाचे महत्त्व ओळखून विविध संस्था स्थापन केल्या. त्यांनी पुण्यात शारदा सदन ही संस्था सुरू केली, जेथे विधवा आणि गरजू महिलांना शिक्षण व आश्रय दिला जात असे. पुढे त्यांनी मुक्ती मिशन (केडगाव) येथे स्थापन केले, जे आजही समाजसेवेचे कार्य करत आहे.

### परदेश प्रवास आणि विचारप्रसार

रमाबाई यांनी इंग्लंड व अमेरिका येथे प्रवास करून भारतीय महिलांची स्थिती जगासमोर मांडली. त्यांनी 'दि हाय कास्ट हिंदू वूमन' हे पुस्तक लिहून महिलांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकला. त्यांच्या विचारांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरही प्रभाव निर्माण केला.

### योगदान आणि वारसा

पंडिता रमाबाई यांचे कार्य केवळ शिक्षणापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी महिलांना आत्मनिर्भर बनविण्यावर भर दिला. त्यांनी समाजातील रूढी आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठविला. त्यांच्या कार्यामुळे पुढील पिढ्यांना प्रेरणा मिळाली आणि महिला सक्षमीकरणाच्या चळवळीला गती मिळाली.

### स्मृतिदिनाचे महत्त्व

पंडिता रमाबाई यांचा ५ एप्रिल रोजी स्मृतिदिन. आजच्या आधुनिक काळातही स्त्री-पुरुष समानतेसाठी प्रयत्न सुरू असताना त्यांच्या कार्याचे महत्त्व अजूनही तितकेच आहे. पंडिता रमाबाई या केवळ समाजसुधारक नव्हत्या, तर त्या महिलांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होत्या. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजात सकारात्मक बदल घडून आला. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त आपण त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन महिला सक्षमीकरणासाठी योगदान देणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल.



# रंगभूमीवरचा हसरा चेहरा : प्रशांत दामले

**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते प्रशांत दामले यांचा जन्मदिन हा त्यांच्या चाहत्यांसाठी आनंदाचा आणि अभिमानाचा दिवस आहे. आपल्या बहुआयामी अभिनयाने आणि विनोदी शैलीने त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे.



### प्रारंभिक जीवन आणि कारकीर्द

प्रशांत दामले यांचा जन्म ५ एप्रिल १९६१ रोजी झाला. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. त्यांनी रंगभूमीपासून आपल्या कारकिर्दीची सुरूवात केली आणि पुढे चित्रपट व दूरदर्शन क्षेत्रातही आपला ठसा उमटविला.

### रंगभूमीवरील यश

प्रशांत दामले हे मराठी नाटकांच्या माध्यमातून घराघरात पोहोचले. विशेषतः विनोदी नाटकांमधील त्यांच्या भूमिका प्रचंड लोकप्रिय ठरल्या. त्यांनी अनेक सुपरहिट नाटकांमध्ये काम करत प्रेक्षकांना खळखळून हसवले. त्यांच्या अभिनयातील सहजता, टायमिंग आणि ऊर्जा ही त्यांची खास वैशिष्ट्ये आहेत.

### विक्रम आणि यश

प्रशांत दामले यांच्या नावावर सर्वाधिक नाट्यप्रयोग करण्याचा विक्रम आहे. त्यांच्या या कामगिरीची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे. ही बाब त्यांच्या मेहनतीची आणि प्रेक्षकांमधील लोकप्रियतेची साक्ष देते.

### चित्रपट आणि दूरदर्शन क्षेत्र

नाटकांसोबतच त्यांनी अनेक मराठी चित्रपट आणि मालिका यांमध्येही उल्लेखनीय भूमिका साकारल्या. विनोदी भूमिकांसोबतच त्यांनी गंभीर भूमिकाही प्रभावीपणे साकारल्या आहेत. ज्यामुळे त्यांचा अभिनेता म्हणून व्यापक आवाका दिसून येतो.

### व्यक्तिमत्त्व आणि लोकप्रियता

प्रशांत दामले यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे आणि मनमिळावू आहे. प्रेक्षकांशी असलेले त्यांचे नाते हे केवळ कलाकार-प्रेक्षक असे नसून ते एक कुटुंबीय नाते वाटते. त्यांच्या अभिनयामुळे अनेकांना आनंद मिळतो, हीच त्यांच्या यशाची खरी गुरुकिल्ली आहे.

### जन्मदिनाचे महत्त्व

त्यांचा जन्मदिन हा त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा दिवस आहे. त्यांनी मराठी रंगभूमीला दिलेल्या योगदानामुळे अनेक नवोदित कलाकारांना प्रेरणा मिळाली आहे. प्रशांत दामले हे केवळ एक अभिनेते नसून ते मराठी रंगभूमीचे जीवंत दिग्दर्शक आहेत. त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांच्या आयुष्यात आनंदाची फुलं फुलवली आहेत. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो, हीच सदिच्छा...!

**दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फेही त्यांना अनेकोत्तम 'मंगलमय' शुभेच्छा...!**

# समतेसाठी लढणारे महान राष्ट्रनेते : बाबू जगजीवन राम

**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय राजकारण आणि समाजसुधारणेच्या इतिहासात बाबू जगजीवन राम यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा घेणे म्हणजे सामाजिक समतेसाठीच्या संघर्षाची प्रेरणादायी कहाणी पुन्हा अनुभवणे होय.

### प्रारंभिक जीवन आणि शिक्षण

बाबू जगजीवन राम यांचा जन्म ५ एप्रिल १९०८ रोजी बिहारमधील एका सामान्य कुटुंबात झाला. लहानपणापासूनच त्यांनी सामाजिक भेदभावाचा अनुभव घेतला. परंतु त्यावर मात करत त्यांनी शिक्षणात प्रावीण्य मिळविले. त्यांनी बनारस हिंदू विद्यापीठ आणि नंतर कोलकता विद्यापीठात शिक्षण घेतले.

### स्वातंत्र्यलढ्यातील योगदान

बाबू जगजीवन राम यांनी भारतीय स्वातंत्र्यलढा मध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी महात्मा गांधी यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत सामाजिक न्याय आणि समानतेसाठी लढा दिला. त्यांच्या नेतृत्वामुळे वंचित घटकांमध्ये स्वातंत्र्यलढ्याविषयी जागरूकता निर्माण झाली.

### राजकीय कारकीर्द

स्वातंत्र्यानंतर बाबू जगजीवन राम यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले. ते भारताचे संरक्षणमंत्री, कृषिमंत्री आणि कामगारमंत्री म्हणून कार्यरत होते. विशेषतः १९७१ च्या युद्धकाळात संरक्षणमंत्री म्हणून त्यांनी प्रभावी नेतृत्व केले, ज्यामुळे भारताला निर्णायक विजय मिळवता आला.

### सामाजिक समतेसाठी योगदान

बाबू जगजीवन राम यांनी दलित आणि वंचित समाजाच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी सामाजिक विषमता, अस्पृश्यता आणि भेदभावाविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या प्रयत्नांमुळे समाजातील दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली.

### प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

त्यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टीमुळे ते सर्वसामान्यांच्या मनात घर करून राहिले. त्यांनी राजकारणाला समाजसेवेचे माध्यम मानले आणि आपल्या कार्यातून ते सिद्धही केले.



### जन्मदिनाचे महत्त्व

बाबू जगजीवन राम यांचा जन्मदिन हा केवळ स्मरणाचा दिवस नसून सामाजिक समतेची जाणीव करून देणारा दिवस आहे. त्यांच्या विचारांचा आदर्श घेत आपण भेदभावमुक्त समाज घडवण्यासाठी प्रयत्न करणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल. बाबू जगजीवन राम हे भारतीय लोकशाहीचे एक मजबूत स्तंभ होते. त्यांच्या कार्यामुळे समाजात समानतेचा संदेश पसरला. त्यांच्या जन्मदिनानिमित्त आपण त्यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून न्याय्य आणि समताधिष्ठित समाज घडवण्याचा संकल्प करूया.

# प्रखर देशभक्त : सरस्वती राजामणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वय फक्त १६ वर्षे. पण काळजात धगधगती देशभक्ती. सिनेमातील जासूस आपण पाहतो. मात्र, सरस्वती राजामणी यांचा थरार वाचला तर तुम्हाला 'धुरंधर' सुद्धा फिका वाटेल.

नेताजींनी जेव्हा आझाद हिंद सेनेसाठी मदतीचे आवाहन केले, तेव्हा १०-१२ वर्षांच्या सरस्वतींनी आपले सर्व सोन्याचे दागिने दान केले. नेताजींना वाटले मुलगी लहान आहे, त्यांनी दागिने परत केले. पण या चिमुकलीने ते घेण्यास नकार देऊन 'देशभक्ती' सिद्ध केली.

नेताजींच्या सांगण्यावरून १६ व्या वर्षी त्या 'आझाद हिंद सेने'त गुप्तहेर म्हणून सामील झाल्या. इंग्रजांच्या छावणीत माहिती काढण्यासाठी त्यांनी मुलाचा वेष धारण केला आणि दोन वर्षे शत्रूच्या गोटात राहून महत्त्वाची माहिती नेताजींपर्यंत पोहोचविली.

### नेताजींचा जीव वाचवला

एकदा इंग्रजांनी नेताजींना मारण्याचा कट रचला होता, पण सरस्वतींनी जीवाची पर्वा न करता ही माहिती वेळेत पोहोचविली आणि नेताजींना वाचवले. एका मोहिमेदरम्यान त्यांच्या पायाला इंग्रजांची गोळी लागली होती, तरीही त्या लंगडत पळाल्या आणि आपल्या सहकाऱ्याला वाचवून छावणीत परतल्या. त्यांच्या या धाडसामुळे नेताजींनी त्यांना 'सरस्वती' हे नाव दिले.



स्वातंत्र्यानंतर ज्या वीर कन्येने देशासाठी रक्ताचे पाणी केले ती गुमनामीच्या अंधारात हरवून गेली. चेन्नईत एका छोट्या खोलीत त्यांनी आपले पुढील आयुष्य अत्यंत गरिबीत काढले. सिनेमातील जासूसांना आपण डोक्यावर घेतो, पण या खऱ्या 'धुरंधर' नायिकेला मात्र समाज विसरला. अंगावर काटा आणणाऱ्या या 'खऱ्या जासूसासाठी' कमेंटमध्ये एक 'जय हिंद' आणि 'रिस्पेक्ट' तर बनतोच. तुम्हाला या महान वीरांगनेबद्दल आधी माहिती होते का?

# वडिलांनी नाते तोडले, मित्रांनी थट्टा केली

## सर्व विरोध झुगारत यश मिळविणाऱ्या सीमा रैकवारची कहाणी

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्वतःचा खर्च आणि जीमची फी भरण्यासाठी सीमाने मेडिकल स्टोअर आणि ब्यूटिपार्लरमध्ये काम केले. ती लढली आणि जिंकली. एकीकडे विरोध होता. त्याला ती सामोरी गेली. वेळ पडताच मेडिकल स्टोअरमध्ये काम केले. ब्यूटिपार्लरमध्येही कामाला राहिली. पण जिद्द सोडली नाही. शेवटी तिच्या मेहनतीला फळ मिळाले. यश तिच्या पायाजवळ आले. त्यामुळे तिची चर्चा आज संपूर्ण राज्यात होत आहे. ती म्हणजे सीमा रैकवार. या २५ वर्षीय तरुणीने जे करून दाखविले त्याला तोड नाही. मध्य प्रदेशातील सागर जिल्ह्यातील एका छोट्या गावातून आलेल्या सीमा रैकवारने जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यशोशिखर गाठले आहे. सामाजिक बंधने, आर्थिक चणचण आणि कौटुंबिक विरोधाला न जुमानता सीमाने सीहोर येथे आयोजित पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक पटकावून सर्वांनाच आश्चर्यचकित केले आहे.





एका सामान्य कुटुंबात जन्मलेल्या सीमाला पोलीस दलात भरती व्हायचे होते. अभ्यासासाठी ती शहरात आली. मात्र तेथे तिला पॉवरलिफ्टिंग या खेळाची ओढ लागली. मुलीने जीममध्ये जाणे समाजाला मान्य होणार नाही, या भीतीने वडिलांनी तिला कडाडून विरोध केला. तुला हे करता येणार नाही, अशा शब्दांत तिला सांगितले गेले. एवढेच नव्हे, तर वडिलांनी तिच्याशी तब्बल २ वर्षे संवाद साधला नाही. जवळपास नाते तोडले. हे कमी की काय म्हणून घरून मिळणारी आर्थिक मदतही बंद केली. मात्र, सीमाने हार मानली नाही. ती या परिस्थितीशी लढली आणि जिंकली.

स्वतःचा खर्च आणि जीमची फी भरण्यासाठी सीमाने मेडिकल स्टोअर आणि ब्यूटिपार्लरमध्ये काम केले. प्रशिक्षणासाठी ती दररोज ट्रेनने ७० कि. मी. प्रवास करायची. अनेकदा तिकिटाचे पैसे नसायचे, पण खेळाप्रती असलेली निष्ठा तिला स्वस्थ बसू देत नव्हती. आज तिच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून, प्रतिकूल परिस्थितीत स्वप्न पाहणाऱ्या मुलींसाठी ती एक आदर्श ठरली आहे. वडिलांनी घरातून मदत बंद केल्यानंतर सीमाने ब्यूटिपार्लरमध्ये काम करून आपली स्वप्ने जीवंत ठेवली. टीका करणाऱ्यांची तोंडे आपल्या यशाने कशी बंद करायची, हे सागरच्या सीमा रैकवारने दाखवून दिले आहे. 'मुलींनी घराच्या उंबरठ्यात राहावे' अशा विचारांच्या गावातून आलेल्या सीमाने जेव्हा पॉवरलिफ्टिंग निवडले, तेव्हा समाजासह मित्र-मैत्रिणींनीही तिची थट्टा उडवली. 'तू मुलांसारखी दिसतेस, मुलांसारखी चालतेस' असे टोमणे तिला रोज ऐकावे लागत होते.

सकाळी सहा वाजता घरून निघून रात्री उशिरापर्यंत तिचा सराव आणि काम सुरू असायचे. अनेकवेळा अपयश आल्याने ती खचली होती. पण तिच्या गुरूंनी दिलेला विश्वास तिने सार्थ ठरला. सिहोरमधील स्पर्धेत तिने शिवपुरीच्या खेळाडूला कडवी झुंज देत रौप्यपदकावर आपले नाव कोरले. सीमाने मिळविलेले हे पदक केवळ एका खेळाडूचे विजयचिन्ह नसून, त्या बापासाठी दिलेले उत्तर आहे. ज्यांनी तिच्याशी बोलणे सोडले होते. 'ही तर फक्त सुरूवात आहे. आता देशासाठी सुवर्णपदक जिंकण्याचे माझे स्वप्न आहे', असा निर्धार सीमाने व्यक्त केला आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे






मना सज्जना...

# आपुल्या हिता जो असे जागता...

परम स्नेही मित्रहो,

**श्लोक**

**मना सज्जना हीत माझे करावे ।**
**रघूनायका दृढ चित्ती धरावे ।**
**महाराज तो स्वामी वायु सुताचा ।**
**जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा ॥२२॥**

समर्थ येथे मनाला विनवणी करताहेत. रघुनायक, प्रभू श्रीरामचंद्र यांचे ध्यान सतत व्हावे. यासाठी चित्तात त्यांचे स्थान अढळ असावे म्हणून मनाने निश्चय करावयाचा आहे.

या मनाच्या श्लोकांच्या अर्थाचा शोध घेताना जो प्रवास घडतोय तो आत्मज्ञान घडविणारा आहे. आत्मिक जागृतीचा आहे, यात शंका नाही. जसजसे अर्थ उलगडत जातात तसतसे अधिकाधिक समजून घ्यायला आवडत जाते. या श्लोकात 'हित माझे करावे' असे म्हटले आहे. हे हित नेमके काय? असा प्रश्न पडणे साहजिकच आहे. हित म्हणजे लौकिक अर्थाने स्वार्थ; परंतु येथे त्याला व्यापक अर्थाने घ्यावे लागते. हित म्हणजे आत्मज्ञान होण्यासाठी करावयाचे उपासना साधन. ज्यात ईश्वराचे नामस्मरण करणे त्यातून



एकाग्रता साधने हे अपेक्षित आहे. एकाग्रता साधली की अंतर्मुखता साधता येते. मग ईश्वराचे मनन चिंतन साधता येते. अशा रघुनायकाचे हृदयी चिंतन करावे जो वायू सुताचा म्हणजे मारोतीराया स्वामी आहे. जो आपल्या भक्ताच्या उद्धारासाठी सदैव तत्पर आहे. त्याचे स्मरण करावे. ज्याने हित साधले जाईल. तुकोबा म्हणतात,

**आपुलिया हिता जो असे जागता।**
**धन्य माता पिता तयाचिया॥**
**कुळी कन्या पुत्र होती जी सात्विक।**
**तयाचा हरिख वाटे देवा॥**

मनाच्या बऱ्या-वाईट संकल्पाच्या परिणामी आपल्याला भोग भोगावे लागतातच तेव्हा आपल्या हिताचे कारणे सदैव सावधान राहून आयुष्य काढावे हेच उत्तम नाही का? अशा सजग व्यक्तीचा प्रत्यक्ष देवालाही हेवा वाटतो.

पुढील श्लोकात मनाला आणखी विनवणी आहे.

**न बोले मना राघवे वीण काही ।**
**जनी वावगे बोलता सुख नाही ।**
**घडीने घडी काळ आयुष्य नेतो ।**
**देहांती तुला कोण सोडू पाहतो ॥२३॥**

आपल्या वाचेवर नेहमी राघवाचे नाम असावे. ते असले म्हणजे वावगे बोलायचे प्रसंग येत नाही. त्यातून वाद उद्भवत नाहीत. लोकांत वावरताना प्रसंगी वावगे बोल बोलावे लागतात. त्यामुळे त्याचे विपरीत परीणाम देखील टळत नाहीत. क्षणाक्षणाने आयुष्य कमी कमी होत असते. परंतु आपण जगण्याच्या या रहाटगाडग्यात येथे गुरफटून गेलेलो असतो, की ते आपल्याला ते कळत नाही. आणि जेव्हा वेळ निघून जाते तेव्हा मात्र पश्चाताप करण्याशिवाय आपल्या हाती काहीही राहत नाही. आजवर केलेले ईश्वराचे ध्यान, भक्ती हीच सोबत करते.

वैराग्य निरुपण करताना समर्थांनी याच आशयाचा मार्मिक उपदेश केलेला आहे. तो बघूया...

**माथा प्रपंचाचे ओझे। घेऊन म्हणे माझे माझे।**
**बुडताही न सोडी फुंजे। कुळाभिमाने॥**
**पडिले भ्रांतीचे अंधारे। नागविले अभिमान चौरे।**
**आले अहंतेचे कावेरे। भूतबाधा॥**
**बहुतेक आवर्ती पडिले। प्राणी वाहतची गेले।**
**जेही भगवंताशी बोभाइले। भावार्थबळे ॥**
**देव आपण घालून उडी। तयासी नेले पैलथडी।**
**येर ते अभाविके बापुडी। वाहतचि गेली॥**

**जय जय रघुवीर समर्थ!**

**– भाऊसाहेब देशमुख, अमळनेर.**
**मो. : 94203 89541**

## एकादशी किंवा सोमवारी नारळ का फोडू नये ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


उत्तर : नारळ हे फळ नसून त्यात तीनही देव वास करतात, असे मानले जाते. जर एकादशी किंवा सोमवारी नारळ फोडले तर ब्रह्महत्या किंवा देवहत्या केल्याचे पाप लागते. एकादशी म्हणजे भगवान विष्णूंचा दिवस. त्या दिवशी सर्व देवता भगवान विष्णूंचा उपवास करतात. त्यामुळे नारळ फोडले तर विष्णूंना मारहाण केली, असे पाप लागते. सोमवारी नारळ फोडत नाही. कारण सोमवार हा दिवस महादेवांचा दिवस असतो. नारळात जे पाणी आहे ती गंगा आहे, असे म्हटले जाते. मग नारळ फोडले की त्या गंगेचा अपमान होतो. म्हणजे सांगायचा मुद्दा इतकाच आहे, की नारळ फोडणे हे सोमवार किंवा एकादशीला ब्रह्महत्या असते. म्हणून नारळ फोडत नाही. नारळ हे ब्रह्मांडाचे रूप म्हणून ओळखले जाते. म्हणून नारळाची पूजा करतात. पण नारळ हे देवाचे तत्त्व असल्यामुळे ते सोमवार व एकादशीला फोडत नाही.

## गोस्वामी तुलसी दास जी अवध में...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जब वे नदी में उतर कर अंदर की ओर जा रहे थे, उसी समय एक महिला भी वहां स्नान करने पहुंची। उसे जल्दी स्नान करना था। उसने तुलसीदास जी को देख कर प्रणाम किया और कहा, "बाबा जी! मुझे शीघ्र स्नान करना अनिवार्य है। आप उस ओर मुख कर नदी में खड़े हो जाईए। आपको आपके राम जी की शपथ है, जब तक मैं ना कहूँ, आप न पीछे मुड़ कर देखेंगे, न नदी से बाहर निकलेंगे। गोस्वामी जी ने भी उन महिला को अस्वासन दे, नदी में महिला की ओर पीठ घुमा कर खड़े हो गए।

कड़ाके की ठंड पड़ रही थी। महिला जल्दी जल्दी नहा कर भागी। जल्दबाजी में वह महिला गोस्वामी जी को पीछे मुड़ने व बाहर निकलने को कहना भूल गई। इस कारण गोस्वामी जी घंटों नदी में ही रह गए। जब इतनी देर हो गई और गोस्वामी जी मंदिर नहीं पहुंचे। तब लोग हर जगह उन्हें ढूंढने लगे। ढूंढते ढूंढते पता चला की, गोस्वामी जी स्नान करने गए थे। तब से अभी तक वापस नहीं आए हैं। उनके साथ के लोग सरयू नदी के किनारे जा पहुंचे। उन्होंने वहां पाया की गोस्वामी जी नदी में खड़े हैं। उन्होंने गोस्वामी जी से बाहर निकालने का आग्रह किया। तब गोस्वामी जी ने मना करते हुए कहा, "मैं बाहर नहीं निकल सकता हूँ। एक महिला ने मुझसे शपथ ली है। यदि वह देवी मुझे बाहर निकलने को कहेंगी तभी मैं बाहर निकल



सकता हूं।"

तुलसीदास जी की बात सुनकर सभी लोग हैरान हो गए। धीरे-धीरे यह बात राजा के पास पहुंच गई। राजा कुछ समझ नहीं पाए। वह शीघ्र ही गोस्वामी जी के पास पहुंचे। राजा ने गोस्वामी जी से बाहर निकलने की विनती करते हुए कहा, "किसी व्यक्ति की शपथ के कारण इस कड़ाके की ठंड में नदी में खड़े रहना स्वास्थ्य के लिए सही नही है। सबसे महत्वपूर्ण आपका स्वास्थ्य है।" परंतु, गोस्वामी जी ने उन्हें मना करते हुए बताया कि, "मेरे से कहीं अधिक मेरे प्रभु का नाम महत्वपूर्ण है। उन देवी ने मुझे मेरे प्रभु श्री राम की शपथ दिलाई थी। उनका नाम मेरे पूरे अस्तित्व से अधिक महत्वपूर्ण है।" राजा ने गोस्वामी जी से पूछा, "बाबा जी! उन देवी का नाम क्या है? कहाँ की रहने वाली हैं वो?" इस प्रश्न पर तुलसीदास जी ने राजा से कहा, "मुझे ज्ञात नही है।" तब राजा ने पूरे अवध में ढोल बजवा के उन महिला को शीघ्र सरयू नदी के तीर पर उपस्थित होकर गोस्वामी जी को शपथ मुक्त करने का आदेश दिया। उन महिला को जैसे ही अपनी गलती का आभास हुआ। वे दौड़ती हुई, नदी के तीर पर जा पहुंची। वहाँ हाथ जोड़ कर क्षमा याचना करती हुई गोस्वामी जी से कहने लगी, "बाबा जी! अब आप पीछे मुड़ सकते है और नदी से बाहर भी निकल सकते हैं।" फिर कहने लगी, "हे बाबा जी! मुझसे बड़ा अपराध हुआ। मैं दंड की भागी हूँ। यदि आप की दया हो तो क्षमा करें।" गोस्वामी तुलसीदास ने मुस्काते हुए कहा, "नही देवी! आपसे कोई अपराध नही हुआ है। मेरे प्रभु चाहते थे कि मैं यहां एकांत में श्री सरयू जी के जल में उनकी भक्ति करूँ। मुझे ऐसा करने का शुभअवसर प्राप्त हुआ। इसके लिए आपको धन्यवाद।" ऐसे होते है सिद्ध पुरुष। अन्तः शांत। यह भारत भूमि है, देवभूमि है। जिसे भगवान भी अवतरित होने के योग्य समझते हैं। भारत भूमि संतों की भूमि है।


## संकटात 'हुंकार' भरणारे हनुमानजी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वनवासी, आदिवासी समाजाने कधी अयोध्या बघितली नाही ना संस्कृत ग्रंथ अभ्यासून हे पात्र जाणले नाही. तरीही त्यातील पात्र या समाजात गेल्या कित्येक आदराने पुजले आणि मानले जातात. कारण ते सगळे पात्र त्यांच्या कित्येक पिढ्यांच्या लोककथामध्ये जागले गेले. अनेक पिढ्यांना शक्तीचा बोध करून देणारे आणि संकटात 'हुंकार' भरून पाठीशी उभे राहणारे असेच एक अढळ नाव म्हणजे हनुमानजी.

युगायुगांपासून ज्यांच्या नावाचा जयघोष करत या मातीतील सामान्यातील सामान्य माणसाने लढण्याचे बळ मिळवले, ते मारुतीराया केवळ ग्रंथांमधील देव नाहीत, तर ते या निसर्गाच्या कुशीत राहणाऱ्या प्रत्येकाच्या रक्तातील 'शक्ती' आहेत. जगभरात विविध रामकथा आहेत अंक त्यातील हनुमानजी सुद्धा त्याचा कथांप्रमाणे बदलत जातात. भारतातील विविध भागांत वसलेल्या आदिवासी, वनवासी समुदायात सुद्धा हनुमंतांचे विविध स्वरूप बघायला मिळतात.

मारुतीरायांचे या समुदायाशी असलेले नाते अत्यंत मानवी आणि जिव्हाळ्याचे आहे. जनजातीय लोककथांनुसार हनुमान हे केवळ एक दैवी भक्त नसून ते या मातीचे वीर पुरुष आणि पूर्वज मानले जातात. त्यांना अनेक ठिकाणी 'हणुवंत बली' किंवा 'घोटेवाले बाबा' या नावाने पुजले जाते. भिल्ल समुदायातील लोक मानतात, की ज्याप्रमाणे हनुमानजींनी आपल्या



हृदयात राम, लक्ष्मण आणि माता सीतेला स्थान दिले आहे, त्याप्रमाणे हनुमानजीही त्यांच्या हृदयात आणि दैनंदिन जीवनात सदैव वास करतात. त्यांच्यासाठी हनुमान हे दूरचे देव नसून संकटात धावून येणारे 'सयाने' देव आहेत.

जनजातीय रामायणात हनुमानाचे रूप अत्यंत कौटुंबिक स्तरावर पाहायला मिळते. गुजरातच्या भिल्ल समुदायातील 'रोंम-सीतमानी वारता'मध्ये तर चक्क हनुमानजींचे चित्रण एका विवाहित पुरुषाच्या रूपात केले आहे. या कथेनुसार जेव्हा 'येरिया' नावाचा वानर त्यांच्या पत्नीला पळवून नेतो, तेव्हा हनुमानजी त्या वानराशी युद्ध करून आपल्या पत्नीची सुटका करतात. परधान-गोंड परंपरेत तर हनुमानजी श्रीराम-लक्ष्मण यांना पहिल्या भेटीतच 'मामा' म्हणून हाक मारतात, जे त्यांच्यातील रक्ताच्या नात्यासारखा जिव्हाळा दर्शविते. ओराँव जनजातीमध्ये श्रीराम-माता सीतेचा उल्लेख आजी-आजोबा म्हणून, तर हनुमानजींचा उल्लेख 'काका' (चाचा) म्हणून केला जातो.

केवळ शक्तीच नव्हे, तर हनुमानजी हे आदिम संस्कृतीसाठी 'निसर्गवैद्य' देखील आहेत. द्रोणागिरी पर्वतावरून संजीवनी शोधणारे हनुमानजी आजही अनेक वनवासी पाड्यांवर औषधी वनस्पतींचे रक्षक म्हणून पूजले जातात. आजही अनेक आदिवासी वैदू औषधी गोळा करण्यापूर्वी हनुमानजींचे स्मरण करतात. इतकेच नाही, तर गावाच्या वेशीवर 'खेडेपती' म्हणून बसलेले आमचे हणुवंत बाबा गावावर येणाऱ्या प्रत्येक संकटाशी आणि आजारपणाशी छाती ठोकून उभे असतात. अनेक ठिकाणी त्यांची पूजा मूर्ती रूपात न होता शेंदूर फासलेल्या पाषाण रूपात म्हणजेच 'वीर' म्हणून केली जाते.

हनुमानजींच्या शौर्याच्या आणि लंका दहनाच्या कथाही या अंचलात वैशिष्ट्यपूर्ण आहेत. छोटा नागपूरमधील असुर जमातीच्या कथेनुसार त्यांच्या पूर्वजांनी हनुमानजींच्या खोडसाळपणामुळे त्यांच्या शेपटीला आग लावली होती, जी पुढे लंका दहनाचे कारण ठरली. नारदमुनींनी गमतीने सांगितल्यावरून शेपटीची आग तोंडात धरून विझविताना हनुमानजींचे मुख काळे झाले, अशा भोळ्या श्रद्धाही काही समुदायांत प्रचलित आहेत. सेतू बांधकामाच्या वेळी खारीने केलेली मदत आणि हनुमानजींनी तिला प्रेमाने पाठीवर थोपटल्यामुळे तिच्यावर उमटलेल्या पाच बोटांच्या रेषा, यासारखे प्रसंग आजही या समुदायांच्या वाचिक परंपरेत जीवंत आहेत.

थोडक्यात सांगायचे तर जनजातीय संस्कृतीतील हनुमानजी हे शक्ती, भक्ती आणि संरक्षणाचे जीवंत प्रतीक आहेत. गुराखी आपल्या गाईंच्या रक्षणासाठी जो लठ्ठ वापरतात, तो हनुमानजींच्या गदेचाच अंश मानला जातो, ज्याला 'रामलठ्ठ' म्हणतात. 'राम राखे एने कोण मारे' या विश्वासाने हा समुदाय आजही हनुमानजींच्या प्रेरणेतून आपले खडतर जीवन आनंदाने जगत आहे.

## नाममहिमा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**सुलभः सुव्रतः सिद्धः शत्रुजिच्छशत्रुतापनः।**

### सुलभ

सुखेनैव अनायासेन लभ्यते इति सुलभः । जो सुखानें म्हणजे कष्टांवांचून लाभतो तो सुलभ म्हणावयाचा. परमात्मा हा सुलभ कसा ? तो तर योग्यांनाहि दुर्लभ म्हटला आहे. ज्ञान्यांनाहि काहीं तो सहज मिळत नाही. म्हटलेच आहे'-बहुना जन्मनां अन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते'. आणि वेदपाठ, तप, यज्ञ, दान हीं तर उघडच महाकठिण कर्मेंच होत. ही सगळी आत्मदर्शनाची वा भगवत्-प्राप्तीची साधनें निःसंशय सोपी नाहींत.प्रेमभक्ति हे साधन यांच्याहून सो म्हटले जाते. पण तें प्रेम ती भक्तिहि कांहीं सोपी नाही. हृदयांत तो ओलावा उत्पन्न झाला पाहिजे ना ? तो प्रेमपूर जीवन नौका सहज वाहून नेईल. पण खडकाळ जमिनीवरून नौका सरंकवणे किती कष्टाचें ! सारांश, कोणतेहि साधन करा, त्या वेगवेगळ्या साधनांत कांहीं उजवें डावें खुशाल असू द्या, परंतु ती सर्व सुलभ म्हणतांच येत नाहीत. ती अनायास नाहीत त्यांत सायास आहे, अशा सायासांनी जो लाभावयाच तो परमात्मा सुलभ कसा म्हणता येईल ? पण खरोखर तो अत्यन्त सुलभ आहे. कारण तो निजरूप आहे एखादी बाहेरची वस्तु मिळवणे कठिण सोपें म्हणत येईल. पण जी वस्तु तुम्ही स्वतःच आहांती मिळविफ सोपें कठिण म्हणणे याला कुठे वाव आहे ? स्मरणकरतांच ती तुम्हाला मिळते इतकी ती सुलभ आहे. किंबहुना एवढेहि कष्ट नकोत. तुम्ही विसरून गेलतरी तुम्हांला ती सदैव प्राप्तच आहे. याहून अधिक सुलभ दुसरें कांही असू शकत नाही म्हणून तो निजरूप परमात्मा सुलभ म्हटला आहे.

### सुव्रत

शोभनं व्रतं यस्य सः सुव्रतः । ज्याचें व्रत शोभन आहे तो सुव्रत म्हणावयाचा. व्रत म्हणजे वर्तन, आचरण, नियम. ज्याचे वर्तन स्वाभाविक असतं, स्वभावानुरूप असते, त्याला सुव्रत म्हणतां येईल. म्हणजे त्याचे वर्तन शोभन आहे असे म्हणता येईल. एखाद्या माणसाला दूषण द्यावयाचे झाल्यास म्हटले जातें, काय तू माणूस आहेस का जनावर ? त्यांतहि अगदी निबुद्धता आणि अमंगलता सुचवायची झाल्यास म्हटले जाईल : माणूस आहेस का गाढव ? आपल्या स्वाभाविक कार्यात अदक्ष आणि अपटु कारागिरास म्हटले जाईल, सुतार आहेस का हजाम ? म्हणजे अशोभनता ही अनौचित्यांत आणि अनौचित्य अस्वाभाविकतेंत भरलें आहे. ज्याचा जो सहज धर्म त्याला अनुसरून त्याचे वर्तन असल्यास तो सुव्रत म्हटला जाईल. एखादा प्रौढ माणूस बालिशता करू लागल्यास त्याला काय पोरकट माणूस आहे असे म्हटले जाईल. म्हणजे त्याच्या वयापासून जी अपेक्षा आहे तिला तो उतरत नाही. याप्रमाणें सर्वच विषयांत जो स्वाभाविक वर्तन करणारा आहे तोच सुव्रत म्हणावयाचा. परमात्मा हा असा सुव्रत आहे. "सत्यं वद, धर्मं चर, स्वाध्यायात् मा प्रमदः" अशा धर्माच्या आज्ञा त्याला कराव्याच लागत नाहीत. सत्य दया स्वाध्याय इत्यादि सद्गुण व सदाचार त्याच्या अंगीं उपजतच आहेत. मुरलेले आहेत. सत्य बोलायचे नाही तर दुसरे काय बोलायचे ? दया नाहीं करायची तर दुसरे काय बरे करायचे ? स्वाध्याय नाहीं करायचा तर दुसरे काय करायचे ? असा त्याला प्रश्नच पडेल ? फुलाला जसें सुवास देणेच ठाऊक तसे हे सारे त्याला असते. म्हणून तो सुव्रत होय. या अशा सुव्रत परमात्म्याचे व्रत जे घेतात, म्हणजे त्या परमात्म्याला जे आवडेल तेंच करायचे, दुसरें वर्ण असा जे नियम घेतात तेहि सुव्रत होत. कारण त्यांचा तो नियम स्वस्वरूपानुसंधानरूपच होय. इतर सारें वागणेत विपरीत म्हणून वृजिन होय, पापरूप होय, अशोभन होय.

### सिद्ध

सृष्टीत तीन वस्तु आढळतातः जीव जगत् आणि ईश्वर. पैकी जीव आणि जगत् या दोन वस्तु असिद्ध आहेत, अपूर्ण आहेत. त्यांच्या ठाई अनित्यत्व व असुखत्व आढळते. अनेक दोष भरलेले आढळतात. परंतु तिसरी वस्तु जो परमात्मा तो मात्र निर्दोष आहे, परिपूर्ण आहे, म्हणून तोच एक सिद्ध होय. त्याला अनवाप्त असें कांहीं नाहीं आणि म्हणून अवाप्तव्यहि कांहीं उरत नाही. असा तो कृतार्थ असतो, कृतकृत्य असतो. परंतु जीव व जगत् यांची स्थिति सदैव याच्या विपरीतच असते. सदैव त्यांना दैन्यानें ग्रासलेलें आहे. अनिष्ट-निवारण आणि इष्टसंपादन या कार्यात तीं सदैव धडपडत च आहेत. त्यांना विश्राम कसा तो नाहींच. जिथे दैन्य आहे तिथे तृष्णा आहे. तृष्णा आहे तिथे कर्म आहे. कर्म आहे तिथे अशान्ति आहे. आणि अशान्ति म्हणजेच अस्वस्थता आणि अस्वस्थता म्हणजेच असिद्धि. परमात्मा हा आप्तकाम वा पूर्णकाम अथवा अकाम असल्यामुळे तो सिद्ध आहेच, पण तो साध्य नाहीं वा साधकहि नाहीं या अर्थानेहि तो सिद्धच आहे. सिद्ध म्हणजे स्वतःसिद्ध. प्रमाणांनी सिद्ध करावयाचा पदार्थ तो नव्हे. अथवा साधनांनी सिद्ध करावयाचाहि पदार्थ तो नव्हे. जगांत जे पदार्थ आढळतात ते आप्य, कार्य, संस्कार्य वा विकार्य असे असतात. परंतु आत्मा या कोणत्याहि कोटींत पडत नाही. म्हणून तो म्हणावयाचा सिद्ध. आत्मा म्हणजे निजरूप आप्य म्हणजे बाहेरून कुठून मिळवावयाचे नाही. तें घट-पटवत् कार्यहि नव्हे. अशुद्ध खनिजांतून शोधून सोनें काढावें तसें तें संस्कार्यहि नाहीं अथवा दुधाचे दही बनवावें तसें तें विकार्यहि नव्हे. कोणतीहि क्रिया त्यावर संभवत च नाही म्हणून तो म्हणावयाचा सिद्ध. अर्थात् सिद्ध म्हणजे (१) अक्रिय, (२) स्वतःप्रमाण आणि (३) साधन- निरपेक्ष स्वयंभू.

### शत्रुजित्

शत्रून् जयति इति शत्रुजित् । जो शत्रूंना जिंकतो तो शत्रुजित. शत्रु मित्र मध्यस्थ तटस्थ, त्याच प्रमाणें परका आणि आप्त असले संबंध संभवतात. आणि तद्नुसार त्यांचे परस्पर व्यवहार होत असतात. परंतु ज्याला देहाभिमान नाही आणि देहहि नाहीं त्या परमात्म्याला हे देहौपाधिक संबंध संभवत नाहीत. मग तद्नुसार होणारा व्यवहार तरी कुठून होणार ? शत्रु च नाही, मग त्याला जिकणार काय ? हा युक्तिवाद बिनतोड आहे. परंतु देही जीवांच्या दृष्टीनें तो परमात्मा शत्रुजित् म्हटला जातो. तो स्वतः तसे जाणत नाही वा वागत नाही. सूर्य अन्धकाराचा हन्ता, तमोनुद्, म्हटला जातो. आणि तसा तो असल्याचे आपण प्रत्यहींच पहातच आहों. आणि म्हणूनच तर आपण त्याला तें नांव दिले आहे. पण तुम्ही जर सूर्याला म्हटले की "बा सूर्या, तूं अन्धकारान्तक आहेस, तुझा जयजयकार असो !" तर तो म्हणेल, हे तुम्ही काय बोलतां ? अहो, अन्धकार कसा असतो तेंच मुळी मला ठाऊक नाही, आणि तुम्ही मला खुशाल अन्धकारान्तक म्हणून गौरवीत आहांत. कमाल आहे तुमची ! जरा चिमूटभर अन्धकाराचा नमूना तरी दाखवा मला. परंतु तसे करणे कधी तरी शक्य आहे का ? तात्पर्य, शत्रुजित् इत्यादि सारी त्या परमात्म्याची गौरवपर नामें आमच्या दृष्टीनें होत. त्याच्या दृष्टीनें ती सर्व कल्पित आणि जल्पित मात्र होत. पण ते कसेंहि असले तरी आमच्या दृष्टीनें सर्व शंभर टक्के सत्य आहे. सूर्य अंधाराचा नाश करतो याबद्दल कोणाला काही शंका आहे का ? परमात्माहि तसाच शत्रुजित् आहे. त्याच्या विरुद्ध जें जें उभे होईल तें तें परास्त होईल. त्याचा टिकाव लागावयाचा नाही. तो परमात्मा नरसिंहवत्हिरण्यकशिपूसारख्या शत्रूना लीलया जिंकतो. त्या चित्सूर्यापुढे सारें अज्ञान त्याच्या विकार-रोग-शत्रु-गणांसह पार नामोहरम होते. म्हणून तो परमात्मा शत्रुजित् म्हटला आहे. 'सत्यमेव जयते नानृतम्' या उपनिषद्वचनांत परमात्म्याचे हे शत्रुजित्त्वच स्पष्ट केले आहे.

### शत्रु-तापन

'शत्रुजित् शत्रुतापन' ही एक जोडी आहे. परस्परपूरक नामें आहेत ही. दोहोंचे तात्पर्य एकच आहे. पण अर्थच्छटा भिन्न आहेत. रणांगणावर जो शत्रूंना जिंकतो तो म्हणावयाचा शत्रुजित् आणि एरव्ही प्रत्यक्ष युद्ध चालू नसतांना ज्याचा शत्रूना वचक आहे, धाक आहे, जरब आहे तो म्हणावयाचा शत्रुतापन. जो शत्रुपक्षाला अनुकूल, पोषक, सहायक वर्तन करतो तो शत्रुनंदन म्हटला जातो. कारण त्याच्या वागणुकीनें शत्रूंनाच आनंद होत असतो. त्याच्या उलट हा शत्रुतापन होय. त्याच्या नांवानें रूपानें गुणानें कर्मानें शत्रु सदैव रडत राहतो, कण्हत राहतो. परमात्मा हा असा शत्रुतापन आहे. सूर्योदयाबरोबर अंधार नेस्तनाबूद होतो. पण सूर्याचे नांव ऐकूनच अरुणोदय होत आहे असें पाहूनच, दिवाभीत आणि कोल्ही आपले तोंड काळे करतात. त्याप्रमाणें नित्यशुद्ध बुद्ध मुक्त परमात्मा प्रकट झाला म्हणजे अज्ञानाचे पुरतें वाटोळे होते. पण दैवी गुणांचा अरुणोदय झाला तरी कामक्रोधादि मनोविकार, आणि तज्जनित शीतज्वरोन्मादादि शरीररोग व दंभ-हिंसादि सामाजिक अनर्थ दूर होतात. अशा प्रकारें तो परमात्मा शत्रुजित् तसा शत्रुतापन आहे. शत्रूना अटकेत ठेवणे, त्यांना धाकांत ठेवणे, त्यांना सेवक करून ठेवणे आणि शेवटी त्यांना भक्त करून सोडणे म्हणजे त्यांना नाहीसे करणे होय. ज्ञानानें हृदय अनासक्त, बुद्धि स्थिर, मन निःसंकल्प, इन्द्रियें शान्त आणि शरीर निरोग व सत्प्रवृत होते. आणि अशा प्रकारें तें अंतर्गत म्हणजे मनोविकार बहिर्गत म्हणजे शरीरज रोग आणि त्यांचे प्रतिबिंबरूप सृष्टिगत व समाजगत शत्रु यांचे म्हणजेच आधि व्याधि उपाधींचे नियंत्रण नियमन आणि निर्मूलन करतें. परमात्मा हा असा सहज शत्रुतापन आहे. त्यासाठी त्याला सायास नाहीं करावे लागत.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**